**प्रसिध्दी पत्रक** 

दिनांक :- 11/04/2025

आरोपी लोकसेवक- श्री. काशिनाथ आनंदा बिरकलवाड, वय 40 वर्ष, व्यवसाय नौकरी, पद- अव्वल कारकून (सहाय्यक महसूल अधिकारी), उप विभागीय अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, रा. फ्लॅट नं. ए-3, अजिंक्यतारा अपार्टमेंट, होणाजीनगर, छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांच्याकडून 40,000/- (चाळीस हजार) रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 30,000(तीस हजार) रुपये लाचेची मागणी करुन 30,000/- (तीस हजार) रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे सिडको, छत्रपती संभाजीनगर शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | :- | श्री. काशिनाथ आनंदा बिरकलवाड, वय 40 वर्ष, व्यवसाय नौकरी, पद- अव्वल कारकून (सहाय्यक महसूल अधिकारी), उप विभागीय अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, रा. फ्लॅट नं. ए-3, अजिंक्यतारा अपार्टमेंट, होणाजीनगर, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागणी रक्कम | :- | 40,000/- (चाळीस हजार रुपये) तडजोडी अंती 30,000/- (तीस हजार) रुपये |
| लाच स्विकृती रक्कम | | 30,000/- (तीस हजार रुपये) |
| सापळा अधिकारी | :- | श्री. केशव दिंडे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे वाळु वाहतूकीच्या हायवा वाहनावर कार्यवाही न करण्यासाठी आलोसे यांनी लाचेची मागणी केली आहे. |
| थोडक्यात माहिती | | यातील तक्रारदार यांचे वाळू वाहतूकीचा हायवा दिनांक 09/04/2025 रोजी वाहतूक करतांना आलोसे यांनी पकडले होते. त्यावेळी आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडे कार्यवाही न करण्यासाठी प्रथम 2,00,000/- (दोन लाख रुपयाची) मागणी करुन तडजोडी अंती 1,10,000/- (एक लाख दहा हजार रुपये) मागणी करुन 70,000/- (सत्तर हजार रुपये) स्विकारले होते. उर्वरीत 40,000/- (चाळीस हजार रुपये) देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे तक्रार दिली आहे.<br>त्याअनुषंगाने दिनांक 10/04/2025 रोजी आलोसे यांच्याकडे तक्रारदार व पंच यांना पाठवून लाच मागणी पडताळणी केली असता आलोसे यांनी स्वत: करीता 40,000/- (चाळीस हजार रुपये) रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 30,000/- (तीस हजार रुपये) लाच मागणी करुन दिनांक 10/04/2025 रोजी आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडून लाच रक्कम 30,000/- (तीस हजार रुपये) पंचा समक्ष जालनारोडवर, रामगिरी हॉटेल समोर, सिडको बसस्टॅण्ड जवळ छत्रपती संभाजीनगर येथे स्वीकारले असता त्यांना लाचेच्या रकमेसह ताब्यात घेण्यात आले असून पो.स्टे.सिडको येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक मा.श्री.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा.श्री.मुकूंद आघाव, पोलीस उप अधीक्षक श्री.सुरेश नाईकनवरे, पोलीस उप अधीक्षक श्री.राजीव तळेकर, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, श्री. केशव दिंडे, यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोह/नागरगोजे, पोलीस अंमलदार, राजेंद्र नंदिले, यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद

ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 9881460103

पोलीस उप अधीक्षक :- 9923247986

11/4/2025

( सुरेश ह. नाईकनवरे )
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.